जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर.
ईमेल :- cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र. ९८१९२०८२७९

प्रेसनोट दिनांक १२.११.२०२५

## ‘‘उघडया दरवाज्यावाटे घरात घुसुन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक ’’

दिनांक ३०/१०/२०२५ रोजी शिळडायघर पोलीस ठाणे हददीत कल्याण शिळ रोडवरील भुमी लॉन्स इमारतीचे रूम नं.२२०४ मध्ये सकाळी ०७:३० वा. चे सुमारास एका अनोळखी व्यक्तीने घरात घुसुन मोबाईल चोरी केल्या वरून डायघर पोलीस स्टेशन गुरंन । ९२८/२०२५ भारतीय न्याय संहीता कलम ३०५ (ए) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. नमुद दाखल गुन्हयाचा मा. वरिष्ठांच्या आदेशाने समांतर तपास गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे कडून करण्यात येत असताना प्रस्तुत गुन्हयामधील संशयित आरोपी अशाच प्रकारे दिनांक ०३/११/२०२५ रोजी मानपाडा पोलीस ठाण्याचे हददीत रूणवाल गार्डन सिटी बिं. न. ५/१००४, व चंद्रेश ज्योती सोसायटी, डोंबिवली पुर्व येथे सकाळचे वेळी चोरी केल्याचे तपासामध्ये निष्पन्न करण्यात आले होते त्याबाबत मानपाडा पोलीस स्टेशन, गुन्हा रजि. नं. १३०४/२०२५, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासामध्ये तांत्रिक माहीतीच्या आधारे आारोपीत हा ज्या दिशेने गुन्हयांचे घटनास्थळी आला व त्याने प्रवासासाठी वापरलेल्या वाहनाची माहीती प्राप्त करण्यासाठी सपोउपनिरी/दयांनद नाईक, पोहवा/संदीप महाडीक पोशि/सागर सुरळकर यांनी आरोपीत याचे घटनास्थळी येण्या-जाण्याचे मार्गावरील सीसीटीव्ही पडताळुन गुन्हयातील आरोपीत सत्यनाथन व्यकंटेशन, वय-३७ वर्षे, रा. ८२४ मुरूगर कवली, उडीया राजा पलायम, अंबुर, ता.ठोथालम जिल्हा-येल्लुर, राज्य-तामिळनाडु, सध्या राहणार-शिळगाव,मिलींद भोईर चाळ, शिळडायघर, ठाणे याची माहीती प्राप्त करून त्याला दिनांक ११/११/२०२५ रोजी मुंब्रा परिसरातुन प्रस्तुत गुन्हयामध्ये ताब्यात घेवुन त्याचे कडे कसुन चौकशी केली असता, त्याने दाखल गुन्हया व्यतिरिक्त नवी मुंबई परिसरातुन रबाळे व खारघर पोलीस ठाणे हददीत आणखी ०२ गुन्हे केल्याची केल्याची कबुली दिली आहे. तसेच अटक आरोपीकडुन एकुन ०४ गुन्हयातील मुददेमाल १) ३०,०००/-रू किं चा डेल कंपनीचा लॅपटॉप २) ४८,०००/-रू किं चा असुस कंपनीचा लॅपटॉप ३) ६९,०००/-रू किं चा एक सफेद रंगाचा आयफोन १४ प्रो ४) २,०००/-रू किं चे एक पिबल कंपनीचे मनगडी घडयाळ ५) २०,०००/-रू कि चा एक ओपो कंपनीचा आकाशी रंगाचा मोबाईल फोन ६) १०,०००/-रू किं चा एक रेडमी कंपनीचा निळया रंगाचा मोबाईल फोन ७) २०,०००/-रू किं चा एक विवो कंपनीचा जाभंळया रंगाचा मोबाईल फोन ८) १५,०००/-रू किं चा एक विवो कंपनीचा निळया रंगाचा मोबाईल असा एकुण **२,१४,०००/-रुपये किमंतीचा मुददेमाल** हस्तगत करण्यात आला आहे.

आरोपीत याचे कडे करण्यात आलेल्या कौशल्यपुर्वक तपासामध्ये त्याने ठाणे, नवी मुंबई परिसरात अशाच प्रकारचे एकुन ०४ गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहेत ते खालील प्रमाणे.

| अ.नं | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं. कलम |
|---|---|---|
| १ | मानपाडा पोलीस स्टेशन | १३०४/२०२५, बीएनएस २०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| २ | डायघर पोलीस स्टेशन | ९२८/२०२५ बीएनएस कलम ३०५(ए) प्रमाणे |
| ३ | रबाळे पोलीस स्टेशन नवी मुंबई | ७९१/२०२५, बीएनएस ३०५ प्रमाणे |
| ४ | खारघर पोलीस स्टेशन नवी मुंबई | ४५३/२०२५, बीएनएस ३०५ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (शोध-१) गुन्हे यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे श्री.सचिन गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोउपनि/दिपक घुगे, सहा.पो.उप निरी./दयांनद नाईक, दिपक जाधव, पोहवा/संदीप महाडीक, प्रशांत निकुंभ, शशीकांत सावंत, पोशि/सागर सुरळकर यांनी केली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर